# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २२०-२३** **दिनांक :- ११/०७/२०२३**

### एम.एस.ई.बी ट्रान्सफॉर्मर मधील ऑइल चोरी करणा-या आरोपीतांना अटक.
### विरार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

फिर्यादी नामे श्री. राजकुमार शामराव कल्लोळकर, वय ५५ वर्षे, हे महाराष्ट्र विद्युत पारिषण मंडळात नोकरी करीत असुन त्यांचे पारिषणचे घानीचा तलाव, विरार पुर्व याठिकाणी बसविण्यात आलेल्या ट्रान्सफॉर्मर मधुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने ४०,०००/- रु. किं. चे एकुण ५५० लिटर ऑइल चोरी केलेबाबत दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. ५८२/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९,३४ अन्वये दिनांक १४/०६/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा शासकीय मालमत्ता चोरी केले संदर्भातील असल्याने गुन्हा लवकरात लवकर उघडकीस आणण्याकरीता वरिष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते. त्या अनुषंगाने विरार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे ठिकाणाचे, आजुबाजुचे परिसरातील तसेच टोल नाक्यावरील सी.सी.टि.व्ही. कॅमेरांची सातत्यपुर्ण तपास केला असता आरोपीतांनी गुन्हा करते वेळी ट्रकचा वापर केला असल्याचे निष्पन्न झाल्याने तांत्रीक विश्लेषणाचे आधारे आरोपी १) बलजिंदरसिंग बक्षीससिंग वाला, रा. हरडकला, पो. ता. अजनाला, जि. अमृतसर राज्य पंजाब, २) हरपालसिंग बलविंदरसिंग सिन्हा, वय ३२ वर्षे, रा. हर्शासिन्हा बिचलाकिल्ला, पो.ता. अजनाला, जि. अमृतसर,राज्य-पंजाब यांना ता. शहापुर, जि. ठाणे येथुन ताब्यात घेण्यात आले असुन त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना वर नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीत यांचेकडे अधिक तपास करता त्यांनी तुळीज पोलीस ठाणेत दाखल असलेला गुन्हा रजि. नं. ४२१/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३७९,३४ अन्वये गुन्हा केल्याचे उघडकीस आणण्यात आले आहे. विरार पोलीस ठाणेत दाखल असलेल्या वर नमुद गुन्हयाचा तपास पो.हवा. आर. के.पारधी हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र कांबळे, पो.नि. श्री. दिलीप राख (गुन्हे) तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.उप.नि.संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, संदीप जाधव, इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, संदीप शेरमाळे, योगेश नागरे, पो.अंम. मोहसिन दिवान, सचिन,बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार यांनी केली आहे.

----0000----